महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

Email :- roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org

Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

क्रमांक : विकाअ/शिक्षण/२०२५/ 1168

दिनांक 21 APR 2025

प्रति,

**प्राचार्य,**

सर्व बीबीए/बीबीएम/बीसीए अभ्यासक्रम चालविणा-या पदवी संस्था,

अमरावती विभाग, अमरावती.

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील SEBC/OBC/EWS संवर्गातील जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत..**

**संदर्भ :** १. या कार्यालयाचे पत्र क्र.विकाअ/शिक्षण/गु.या./२०२५/९० दिनांक ८.१.२०२५

२. मा.सचिव,सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई यांचे शासन निर्णय क्र.संकीर्ण -२०२४/प्र.क्र ७५/आरक्षण-५ दिनांक २२.०७.२०२४

३.मा.उपसचिव,सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई यांचे शासन निर्णय क्र.संकीर्ण -२०२४/प्र.क्र ७५/आरक्षण- दिनांक ०७.०१.२०२५

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील संचालनालया अंतर्गत येत असलेल्या व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या गुणवत्ता याद्या या कार्यालयाचे संदर्भ पत्र क्र.१ मध्ये दिलेल्या सुचनानुसार आपल्या संस्थेमध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता याद्यांची तपासणी करण्यात आलेली आहेत. तथापि, गुणवत्ता यादी तपासणी करतेवेळी ज्या SEBC/OBC/EWS विद्यार्थ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाहीत अशा विद्यार्थ्यांचे प्रवेशास या कार्यालयाव्दारे मान्यता देण्यात येणार नाही.

त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, मा.उपसचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे संदर्भ ३ चे शासन निर्णयामध्ये सदर शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून SEBC/OBC/EWS प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी तीन महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. शासन निर्णय हा दिनांक ०७.०१.२०२५ रोजी निर्गमित झालेला असल्याने अशा प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र दिनांक ०७.०४.२०२५ पर्यंत सादर करणे आवश्यक होते.

तेव्हा याबाबत आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील ज्या SEBC/OBC/EWS विद्यार्थ्यांनी दिनांक ०७.०४.२०२५ पर्यंतचे कालावधीतील जात वैधता प्रमाणपत्र आपणास सादर केलेले असतील अशा विद्यार्थ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र (मुळ प्रत व छायांकीत प्रत ) तसेच संबधित वर्षाची या कार्यालयाव्दारे प्रमाणित केलेली गुणवत्ता यादी या कार्यालयात **दिनांक ३०.०४.२०२५ पर्यंत** सादर कराव्यात जेणे करुन याबाबत पुढील कार्यवाही करणे शक्य होईल. दिनांक ३०.०४.२०२५ नंतर जात वैधता प्रमाणपत्राची प्रकरणे कोणत्याही परिस्थितीत या कार्यालयामार्फत स्विकारल्या जाणार नाही. याची कटाक्षाने नोंद घ्यावी यांनतरची सदरील प्रकरणे आपणास मा.आयुक्त, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा.,मुंबई यांचेकडे करावे लागतील याची सुध्दा नोंद घ्यावी.

**( मनोज म.अंधारे )**

**प्र.सहसंचालक**

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

अमरावती.

**प्रत:** १. **मा. संचालक,** तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांना माहितीकरीता सादर.

२ **प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.